

स्थापना : १९०१
**श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था**
२९६८, 'सी', दसरा चौक, कोल्हापूर-४१६ ००२.
☎ २६४२९२१, २६४०९२२, फॅक्स : (०२३१) २६४१९५४
Email : shahuchha@hotmail.com

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे स्थापना : १९७१
**श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय**
२९६८, 'सी', दसरा चौक, कोल्हापूर-४१६ ००२. ☎ (०२३१) २६४४२०४
फॅक्स : २६४१९५४ • Email : sscm34.cl.@unishivaji.ac.in
Website : www.shahajicollege.ac.in
Re-accredited by NAAC with Grade 'B' (C.G.P.A. 2.61)
Affiliated to : Shivaji University, Kolhapur-416 004, Maharashtra



Office Blog Address : : sscm34admin.blogspot.com

चेअरमन
**श्री. मानसिंग विजयराव बोंद्रे**

ऑन. सेक्रेटरी
**श्री. विजयराव श्रीपतराव बोंद्रे**

प्राचार्य :
**डॉ. आर. के. शानेदिवाण,** एम.ए., पीएच.डी. नेट (मराठी)
Office : (0231) 2644204, Mob. 9960995853

संदर्भ क्र. : एस.एस.सी.एम./

दिनांक :

# कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) स्मृती व्याख्यानमाला

Lat. Shripatrao Bondre (Dada) Memorial Lecture Series

**कै. श्रीपतरव बोंद्रे (दादा) स्मृती व्याख्यानमालेची संकल्पना:**

आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारण आणि समाजकरणातील कै. श्रीपतरव शंकराव बोंद्रे (दादा) हे एक मोठे नाव. कोल्हापूर नगरपालिकेचे नगरसेवक ते महाराष्ट्र राज्याचे कृषिराज्य मंत्री अशी स्वकर्तूत्वावर ओळख निर्माण केलेल्या कै. बोंद्रेदादांनी राजकारण आणि समाजकारण करत असताना छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण आदि थोर व्यक्तींचे विचार अंगीकृत केलेले होते. त्यांनी श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या माध्यमातून या थोर व्यक्तीच्या विचारांची प्रभावी अंमलबजावणी करत बहुजन समाजातील वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्याचे महत्वाचे कार्य केले. कै. बोंद्रेदादांचे श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या जडण-घडणीमध्ये मोलाचे योगदान आहे, त्यांच्या प्रयत्नामुळे महाविद्यालय नावारूपाला आले आहे. सन २०१९-२०२० हे कै. बोंद्रे दादांचे जन्मशताब्दी वर्ष. कै. बोंद्रे दादांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधत महाविद्यालयाने सन २०१७-२०१८ पासून कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) स्मृती व्याख्यानमाला सुरू केली.

**उद्देश:**

१. कै. श्रीपतरव बोंद्रे (दादा) यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणे.
२. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण आदि थोर व्यक्तींच्या विचारांची समकालीन प्रस्तुतता मांडणे.
३. समकालीन सामाजिक, राजकीय, संस्कृतिक क्षेत्रातील विविध विषयावर उद्बोधनपर व्याख्यानांचे आयोजन करणे.

**आयोजित व्याख्याने:**

कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) स्मृती व्याख्यानमालेच्या माध्यमातून गेल्या दोन वर्षात खालील मान्यवर व्यक्तींची विविध विषयावर व्याख्याने आयोजित केली गेली. यामध्ये प्रा. डॉ. अरुण भोसले, श्रीमती डॉ. मंजुश्री पवार, डॉ. चंद्रकुमार नलगे, मा. वसंत भोसले, प्रा. डॉ. मलिकार्जुन माळगी, मा. डॉ. श्रीमंत कोकाटे, मा. डॉ. बी. एम. हिर्डेकर, मा. डॉ. आलोक जत्राटकर इत्यादीं मान्यवारांचा समावेश आहे.

**कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) स्मृती व्याख्यानमालेची उपलब्धी:**

कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) स्मृती व्याख्यानमालेच्या माध्यमातून गेल्या दोन वर्षात आयोजित केलेल्या विविध व्याख्यानांतून समकालीन सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय विषयावर चर्चा घडवून आणण्याचे महत्वाचे व्यासपीठ ठरलेले आहे. विविध क्षेत्रातील मान्यवर आणि तज्ञ व्यक्तींनी या व्यासपीठाच्या माध्यमातून आपले विचार मंथन केलेले आहे यांचा निश्चितच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षेकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना फायदा झालेला आहे. कै. बोंद्रे दादांच्यावर ज्या थोर व्यक्तीच्या विचारांचा प्रभाव होता आणि ज्या विचारांच्या माध्यमातून त्यांची जडण घडण झाली त्या विचारांची समकालीन प्रस्तुतता मांडण्याचा योग कै. बोंद्रेदादांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने आणि औचित्याने होतो आहे. कै. बोंद्रे (दादा) स्मृती व्याख्यानमालेच्या उपक्रमांना शिक्षक आणि विद्यार्थ्यानी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्तम प्रतिसाद दिलेला आहे ही याची जमेची बाजू आहे.